# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**प्रेस नोट**

**दिनांक ०९/०४/२०२२ (शनिवार)**

**(सायंकाळ)**

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
## एकुण २९,४०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त

दिनांक ०७/०४/२०२२ ते दिनांक ०८/०४/२०२२ ०२.०० वा. रोजी रात्री दरम्यान मा. विजयकुमार मगर पोलिस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात नागपूर जिल्हयात राबवलेल्या कोबींग ऑपरेशन तसेच नाकाबंदी दरम्यान पो.स्टे. केळवद येथील ठाणेदार सपोनि श्री अमितकुमार आत्राम सोबत स्टाफ हे रात्री दरम्यान कोबींग ऑपरेशन व बिहाडा फाटा येथे नाकाबंदी डयुटी करीत असतांना त्यांना मिळालेल्या खबरेवरून मध्यप्रदेश मधुन हैद्राबाद येथे कत्तलीकरीता अवैध जनावराची वाहतुक करणारा १० चक्का कंटेनर युपी—७७/एटी —२१५७ या वाहनास थांबवून त्यामधील कत्तलीकरीता वाहतुक होत असलेल्या ४७(बैल, गोवंश) कि. ९,४०,०००/—रू. चे जनावरे व १० चक्का कंटेनर युपी—७७/एटी —२१५७ कि. २०,००,०००/—रू. असा एकुण किंमती २९,४०,०००/— रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. आरोपी नामे— १) इमरान खान मो इर्शाद वय ३२ वर्ष नई बस्ती राजपुर न सिकंदर जि कानपुर उ.प्र, २) वीर पाल रामप्रकाश वय २० वर्ष रा. वैना त . सिकंदर जि. कानपुर (उ.प्र), ३) वाजीद नूर हसन वय २९ वर्ष कैलासपुर त सारंगपुर जि. सारंगपुर (उ.प्र), ४) मो. वसीम मो. शफिक वय ३३ वर्ष कैलासपुर, सारंगपुर जि. सारंगपुर (उ.प्र), ५) फहीम अहमद करीम बक्श वय २६ वर्ष रा. साजापुर त. भोगणीपुर जि. कानपुर (देहात)(उ.प्र) यांच्या विरुध्द पो.स्टे. केळवद येथे कलम ११(१)(घ)(ड)(च) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम ५(अ), ९ महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम तसेच कलम २७९, ३४ भादवी व सहकलम १८४ मोवाका काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री अमितकुमार आत्राम हे करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. विजयकुमार मगर, अपर पोलिस अधीक्षक श्री राहुल माकणीकर, उपविभागिय पोलिस अधिकारी सावनेर श्री. अजय चांदेकर यांचे मार्गदर्शनात ठाणेदार सपोनि श्री अमितकुमार आत्राम, सफौ सुभाष राठोड, पोशी सचिन येळकर, श्रीधर कुलकर्णी, पंकज कोहाड व चालक नापोशि गुणवंता डाखोळे यांनी केलेली आहे.



**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**